परिपत्रक क्र. ०१/२०१२

क्र. उसं/मातं/मुद्रांक शुल्क/माफी/प्रमाणपत्र/२०१२/ ७६० 
उद्योग संचालनालय, नविन प्रशासकीय भवन,
मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२
दि. 9 MAY 2012

# परिपत्रक

विषयः- माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटकांना द्यावयाच्या मुद्रांक शुल्क माफी/सवलत प्रमाणपत्र देणेसाठी प्राधिकारी विहित करणे.

संदर्भ- १) उद्योग संचालनालयाचे परिपत्रक क्र. ६ /१९९९ दि. ०७.०५.१९९९
२) उद्योग संचालनालयाचे परिपत्रक क्र. १९/२००१ दि. २६.११.२००१
३) उद्योग संचालनालयाचे परिपत्रक क्र. १५/२००२ दि. ०८.०७.२००२
४) उद्योग संचालनालयाचे परिपत्रक क्र. ०२/२००४ दि. २०.०१.२००४
५) उद्योग उर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्र. आयटीपी-२००९/(प्र.क्र.१०८)/ उद्योग-२, दि. २९.८.२००९
६) महसुल व वन विभागाचे दि. १.११.२०११ चे आदेश क्र. असाधारण १५३

उपरोक्त संदर्भ क्र. १ मध्ये वेळोवेळी आवश्यकते नुसार परिपत्रके निर्गमित करण्यात आली आहेत. आता संदर्भ क्र. ५ च्या अनुषंगाने महसूल व वन विभागाने संदर्भ ६ अन्वये निर्गमित केलेल्या शासन आदेशानुसार राज्याच्या माहिती तंत्रज्ञान हार्डवेअर आणि दुरसंचार हार्डवेअर उत्पादन करणाऱ्या घटकांसह माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटकांना मुद्रांक शुल्कात सुट अनुज्ञेय करण्यात आली आहे. दि. २९ ऑगस्ट, २००९ रोजी सुरु झालेल्या व दि. १४ ऑगस्ट, २०१४ रोजी संपणा-या कालावधीसाठी (दोन्ही दिवस धरुन)संदर्भ ६ मध्ये नमुद विलेखावर(दस्त) देय असलेल्या मुद्रांक शुल्कातून माफी/ सवलत अनुज्ञेय आहे.

या योजने अंतर्गत मुद्रांक शुल्क सुट/ सवलत देण्यासाठी पात्र घटकांना उद्योग संचालनालयाने मुद्रांक शुल्क सुट/सवलत प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. सदरचे प्रमाणपत्र देण्याकरीता सक्षम प्राधिकारी म्हणून संचालनालयाचे परिपत्रक क्र. ६/९९ व त्या अनुषंगाने वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकानुसार घटकांना इरादापत्र/नोंदणी देण्यासाठी प्राधिकारी व कार्यक्षेत्र विहित करण्यात आले आहे.

या परिपत्रकाद्वारे मुद्रांक शुल्क सुट/सवलत पात्रता प्रमाणपत्र देण्याकरिता खालील अधिकाऱ्यांना त्यांच्यासमोर नमुद कार्यक्षेत्राकरीता प्राधिकृत करण्यात येत आहेत.

| अनु क्र. | नोंदणी प्राधिकारी | उद्योगाचा प्रकार व कार्यक्षेत्र |
|---|---|---|
| १ | उद्योग सह संचालक/विशेष कार्य अधिकारी (मा.तं), उद्योग संचालनालय, मुंबई | राज्यातील विशेष आर्थिक क्षेत्रातील सर्व माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत सेवा उपक्रम (घटक) * |

| अनु क्र. | नोंदणी प्राधिकारी | उद्योगांचा प्रकार व कार्यक्षेत्र |
|---|---|---|
| २ | उद्योग सह संचालक, (मुंप्रावि), (मुंबई शहर व उपनगर जिल्हयातील क्षेत्र करिता) | सुक्ष्म, लघु, मध्यम व मोठे माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत सेवा उपक्रम (घटक) (विशेष आर्थिक क्षेत्रातील सर्व घटक वगळून) |
| ३ | बृहन्मुंबई वगळता, उर्वरित विभागीय सह संचालक व विभागीय अधिक्षकीय उद्योग अधिकारी | मोठे माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत सेवा उपक्रम (घटक) (विशेष आर्थिक क्षेत्रातील सर्व घटक वगळून) |
| ४ | बृहन्मुंबई वगळता, उर्वरित जिल्हयातील संबधीत महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र. | सुक्ष्म, लघु व मध्यम माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत सेवा उपक्रम (घटक) (विशेष आर्थिक क्षेत्रातील सर्व घटक वगळून) |

(* संदर्भ ४ नुसार उद्योग सह संचालक/विशेष कार्य अधिकारी (मातं) हे वर नमुद प्रधिका-यां व्यतिरिक्त राज्यातील मोठ्या/मध्यम/लघु माहिती तंत्रज्ञान घटकांना इरादापत्र अथवा नोंदणी देण्यासाठी सक्षम प्राधिकारी असल्याने अशी प्रकरणे.)

माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत सेवा घटकांना पात्रता प्रमाणपत्र खाली नमुद केलेल्या शर्तीवर निर्गमित करण्यात येईल.

शर्ती:-

१. माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत सेवा घटक म्हणून उद्योग संचालनालयाचे प्राधिकृत अधिका-या कडून इरादापत्र/नोंदणी प्रमाणपत्र निर्गमित असणे बंधनकारक आहे.

२. माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत सेवा उद्योग म्हणून मुद्रांक शुल्क माफीची सवलत घेतलेला घटक, प्रत्यक्षात माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत सेवा उद्योग ऐवजी इतर उद्योग/व्यवसाय करतांना आढळून आल्यास अशी प्रकरणे सक्षम नोंदणी अधिकारी हाताळतील व अशा घटकाकडून घेतलेली मुद्रांक शुल्क माफीची रक्कम व मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार लागू दंड एक रकमी वसूलीस पात्र राहील.

३. ज्या घटकांना या आदेशानुसार सवलती देय राहतील अशा घटकांना अन्य कोणत्याही आदेशाद्वारे अथवा नियमाद्वारे जाहीर केलेल्या कोणत्याही सामुहिक प्रोत्साहन योजने अंतर्गत मुद्रांक शुल्कातून माफी/ सवलत अनुज्ञेय असणार नाही.

४. मुद्रांक शुल्क सवलतीचे प्रमाणपत्र माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत सेवा धोरण २००९ च्या कालावधी करिता ग्राहय आहे.

५. माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत सेवा घटक एकदाच मुद्रांक शुल्क सवलतीसाठी पात्र राहिल.

संबंधित प्राधिका-याने सोबत जोडण्यात आलेल्या नमुन्यामध्ये तिमाही अहवाल उद्योग संचालनालयाकडे पाठविणे अनिवार्य आहे.

(संजय सेठी)
सचिव (लमउ) तथा
विकास आयुक्त (उद्योग)